बीडचा
epaper : www.lokprashna.com

# लोकप्रश्न

Email - dainiklokprashna@gmail.com

रविवार दि. ८ फेब्रुवारी २०१५ ■ Reg. No. L / Beed/21/2014-2016 RNI Reg. No. MAHMAR/2010/31

## कालिकादेवी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्यूह

शिरूर । वार्ताहर

कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात यशस्वी इन्स्टिटयूट फॉर स्किल डेव्हलपमेंट पुणे या संस्थेतर्गत कॅम्पस इंटरव्यूव्हचे आयोजन दि.१६ फेब्रुवारी रोजी केले आहे, तरी तंत्रशिक्षण आय.टी.आय. व बी.ए. बी.कॉम /बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या शेवटच्या वर्षातील व शिरूर परिसरातील सर्व माजी पदवीर विद्यार्थ्यांना या कॅम्पस इंटरव्यूहमध्ये सहभागी होता येणार आहे. या मुलाखतीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना टाटा, महिंद्रा, बजाज, विप्रो, बिर्लो इ. नामांकित कंपनीची आदेश दिली जाणार आहे. त्यांना नोकरी देण्याबरोबरच त्याच्यातील कौशल्यही विकसित केले जाणार आहे, करिता शिरूर परिसरातील आजी माजी विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.पी.बी. देशमाने यांनी केले आहे. कॅम्पस इंटरव्यूह महाविद्यालयातील वाणिज्य विभाग, प्लेसमेंट सेल व यशस्वी इंन्स्टियूट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपली नावे प्रा.ज्ञानेश्वर येवले, प्रा.विठ्ठल गुंडे, प्रा.संदीप संपाळ, डॉ.आडगावकर, यांच्याकडे द्यावीत.

Scanned by CamScanner

सुराज्य
रविवार दि. ८ फेब्रुवारी २०१५

# कालिकादेवी महाविद्यालयात कॅम्पस् इंटरव्यूहचे आयोजन

शिरूर कासार । वार्ताहर

कालिकादेवी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'यशस्वी इन्स्टिट्यूट फॉर स्किल डेव्हलपमेंट पुणे या संस्थे अंतर्गत कॅम्पस इंटरव्यूहचे आयोजन दि. १६ फेब्रु. रोजी सोमवारी केले आहे तरी तंत्रशिक्षण आयटीआय व बीए,बीकॉम,बीएस्सी तृतीय वर्षाच्या व शेवटच्या वर्षातील व शिरूर परिसरातील सर्व माजी पदवीधर विद्यार्थ्यांना व कॅम्पस इंटरव्यूह मध्ये सहभागी होता येणार आहे. या मुलाखतीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना टाटा, महिंद्रा, बजाज, विप्रो , बिर्ला इ. नामांकित कंपनीची आदेश दिली जाणार आहे. त्यांना नोकरी देण्याबरोबरच त्याच्यातील कौशल्यही विकसित केले जाणार आहे. तरी शिरूर परिसरातील आजी,माजी विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.पी.बी. देशमाने यांनी केले आहे.कॅम्पस इंटरव्युह महाविद्यालयातील वाणिज्य विभाग, प्लेसमेंट सेल व यशस्वी इंनिस्टयुट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले आहे. इच्छूक विद्यार्थ्यांनी आपली नावे प्रा. ज्ञानेश्वर येवले, प्रा.विठ्ठल गुंडे, प्रा.संदिप संपाळ, डॉ.आडगांवकर जी.एस. यांच्याकडे दयावीत.

Scanned by CamScanner

चंपावतीपत्र

सोमवार, दि. ०९ फेब्रुवारी २०१५

# कालिकादेवी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्युहचे आयोजन

शिरूर का.(वार्ताहार):-कालिकादेवी कल, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात यशस्वी इन्टस्टीटयुट फॉर स्किल डेव्हलपमेन्ट पुणे या संस्थे अंतर्गत कॅम्पस इंटरव्युहचे मुलाखतीचे आयोजन दि. १६-०२-२०१५ वार सोमवार रोजी केले आहे, तरी तंत्रशिक्षण आयटी व बी.ए. बी.कॉम, बी.एस.सी तृतीय वर्षाच्या शेवटच्या वर्षातील व शिरूर परिसरातील सर्व माजी पदवीधर विद्यार्थ्यांना या कॅम्पस इंटरव्हयु मध्ये सहभागी होता येणार आहे. या मुलाखतीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना टाटा, महिंद्रा, बजाज विप्रो, बिर्ला, इ नामांकित कंपनीची आदेश ऑर्डर दिली जाणार आहे. त्यांनी नौकरी देण्याबरोबरच त्यांच्यातील कौशल्यही विकसित केले जाणार आहे व Diploma in Mechanical Engineering Diploma in Industry in Engineering , Diploma in Electronics & Tele Communication इ. पदविका प्राप्त करण्याची संधी या मुलाखतीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मिळणार आहे. करिता शिरूर परिसरातील आजी माजी विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आहान महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.पी.बी. देशमाने यांनी केले आहे.

कॅम्पस इंटरव्युह महाविद्यालयातील वाणिज्य विभाग ,प्लेसमेंट सेल व यशस्वी इन्स्टीटयुट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपली नावे प्रा.ज्ञानेश्वर येवले वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.विठठल गुंडे इतिहास विभाग प्रमुख ,प्रा.संदिप संपाळ, रसायनशास्त्र,विभाग डॉ.आरगावकर जी.एस. वाणिज्य विभाग यांच्याकडे दयावीत.

Scanned by CamScanner

दिव्य मराठी
बीड जिल्हा
बीड, सोमवार, ९ फेब्रुवारी २०१५

# कालिकादेवी कॉलेज येथे कॅम्पस इंटरव्ह्यू

**बीड** | शिरूर येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात यशस्वी इन्स्टिट्युट फॉर स्किल डेव्हलपमेंट पुणे या संस्थेअंतर्गत १६ फेब्रुवारीला कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले .

तंत्रशिक्षण व बी. ए., बी. कॉम, बी. एस्सी. तृतीय वर्षाच्या वर्षातील व शिरूर परिसरातील सर्व माजी पदवीधर विद्यार्थ्यांना या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सहभागी होता येणार आहे.

या मुलाखतीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना टाटा, महिंद्रा, बजाज, विप्रो, बिर्ला आदी नामांकित कंपनीत काम करण्याच संधी मिळणार आहे. तालुक्यातील आजी, माजी विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. पी. बी. देशमाने यांनी केले आहे.

Scanned by CamScanner

औरंगाबाद, शुक्रवार, २० फेब्रुवारी २०१५ । किंमत ₹ तीन

सकाळ



शिरुर कासार : रविवारी कॅम्पस इन्टरव्ह्यूमध्ये बोलताना प्रा. ज्ञानेश्वर येवले.

# कालिकादेवी महाविद्यालयात कॅम्पस इन्टरव्ह्यू

बीड, ता. १९ : डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त शिरूर तालुक्यातील कालिकादेवी महाविद्यालयात रविवारी (ता.१५) कॅम्पस इन्टरव्ह्यूचे उद्‌घाटन आयटीआयचे निदेशक प्रा. व्ही. एम. घुगे यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्या डॉ. पी. बी. देशमाने अध्यक्षस्थानी होत्या. या वेळी यशस्वी इन्स्टिट्यूट फॉर स्कील डेव्हलपमेंटचे आदिनाथ खेडकर, एन. चौधरी, गटविकास अधिकारी व्ही. एंन. घोडके यांची उपस्थिती होती. प्रा. ज्ञानेश्वर येवले यांचे या वेळी भाषण झाले. कॅम्पस इन्टरव्ह्यूमध्ये २४३ विद्यार्थी सहभागी झाले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना टाटा, महिंद्रा, बजाज, विप्रो, बिर्ला आदी नामांकित कंपन्यांत नोकरीची संधी मिळणार आहे.

Scanned by CamScanner

दैनिक
# दिव्य मराठी
दैनिक भास्कर समूहाचे मराठी वृत्तपत्र
i.com
औरंगाबाद मंगळवार, २४ फेब्रुवारी २०१५

**नोकरीची संधी** | कालिकादेवी महाविद्यालयाचा उपक्रम

## कॅम्पस मुलाखतीत २४३ तरुणांचा जोश

### रोजगारासह शिक्षणाची तरुणांना कंपन्यात संधी

प्रतिनिधी | बीड

शिक्षण घेतानाच रोजगाराची संधी मिळत असल्याने शिरूर कासार येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात झालेल्या कॅम्पस मुलाखतीसाठी एक नव्हे दोन नव्हे, तर तब्बल २४३ तरुणांनी सहभाग नोंदवला.

बीडचे माजी नगराध्यक्ष व संस्थेचे मार्गदर्शक डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पुणे येथील यशस्वी इन्स्टिट्यूट फॉर स्किल डेव्हलपमेंटच्या वतीने कालिकादेवी महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या प्लेसमेंट सेलअंतर्गत या कॅम्पस मुलाखतींचे आयोजन केले होते. आयटीआयचे निदेशक प्रा. व्ही. एम. धुगे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पी. बी. देशमाने उपस्थित होत्या. या वेळी यशस्वी कंपनीचे अधिकारी आदिनाथ खेडकर, एन. चौधरी तसेच गटविकास अधिकारी व्ही. एन. घोडके उपस्थित होते. या वेळी प्राचार्य डॉ. पी. बी. देशमाने म्हणाल्या, ग्रामीण भागातील महाविद्यालयात विविध अडचणी असतात, तरीही महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. डिग्रीपेक्षा सक्षम अनुभव महत्त्वाचा आहे. तंत्रज्ञानाच्या युगात तरुणांनी कौशल्ये आत्मसात करून जीवनात यशस्वी होण्याचे आवाहन त्यांनी केले. सचोटी व विनम्रता असेल तर कुठल्याही क्षेत्रात कर्तृत्वाचा ठसा उमटविता येतो असे त्या म्हणाल्या. या वेळी एन. चौधरी व आदिनाथ खेडकर यांनी माहिती दिली. प्रास्ताविक प्लेसमेंट सेलचे चेअरमन प्रा. डॉ. गणेश आडगावकर यांनी केले. संचालन वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. ज्ञानेश्वर येवले यांनी केले. प्रा. चेतना डोंगळीकर यांनी आभार मानले.



मुलाखतीआधी एलसीडी प्रोजेक्टरद्वारे विविध कंपन्यांची माहिती देण्यात आली.

### संधीचे सोने करा

"कॅम्पस मुलाखती विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी आहे. पगार किती मिळतो यापेक्षा ट्रेनिंगचा अनुभव महत्त्वाचा आहे. नोकरी करत शिक्षण पूर्ण करावे. शाळा, महाविद्यालय, आयटीआयमधून पुस्तकी ज्ञान मिळते. परंतु फिल्डवर्क हे कंपन्यांमधूनच होते. संधीचे सोने करावे."
प्रा. व्ही. एम. धुगे, निदेशक, आयटीआय.

### ग्रामीण विद्यार्थी

"कॅम्पसमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना टाटा, महिंद्रा, बजाज, विप्रो, बिर्ला आदी नामांकित कंपन्यांत नोकरीची संधी मिळणार आहे. रोजगारासोबतच कौशल्य विकसित केले जाणार आहे. शिरूरसह मादूर, घाटशीळ, परगाव, रायमोहा येथील २४३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला."
प्रा. डॉ. गणेश आडगावकर, शिरूर.

### समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न

"महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्वतःच्या करिअरबरोबरच सामाजिक प्रश्नांकडे डोळसपणे पाहावे. मोबाइल, पैसा यापेक्षा शौचालय महत्त्वाचे आहे. सरकारी नोकरीत संधी मिळाल्यास सामाजिक बांधिलकी जपावी. समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करा." व्ही. एन. घोडके, गटविकास अधिकारी

Scanned by CamScanner